(महाराष्ट्र पोलीस राजपत्र विभागीय भाग - ६ करिता)

क्र.पोमसं/५/१०/वेगवर्धित पदोन्नती/३०/२०१७.
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई - ४०० ००१.
दिनांक :- ०७ /०३/२०१८.

**वाचा :-** १) शासन निर्णय, गृह विभाग, क्र.एनपीसी-१००८/सीआर-६/पोल-३, दि.१५/०७/२०१३, आणि

२) शासन निर्णय, गृह विभाग, क्र.पीएम्एन्-१०१२/प्र.क्र.१६५/पोल-५ ब, दि.२०/०५/२०१४.

## आदेश

राज्यातील नक्षलग्रस्त भागात अत्युत्कृष्ट व वैशिष्टपूर्ण कामगिरी करणाऱ्या नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षक यांना लगतच्या वरिष्ठ पदावर वेगवर्धित पदोन्नती (Accelerated Promotion) देण्याकरिता शासन निर्णय, गृह विभाग, क्र.पीएमएन-१०१२/११३२/प्र.क्र.१६५/पोल-५ब, दिनांक २०/०५/२०१४ अन्वये शासनाने आदेश दिले आहेत. त्यास अनुसरुन विभागीय वेगवर्धित पदोन्नती समितीसमोर सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने पोलीस कर्मचाऱ्यांनी बजावलेली कामगिरी व त्यांनी नक्षल विरोधी अभियानासाठी दिलेले योगदानावर विस्तृत चर्चेअंती नि:शस्त्र पोलीस कर्मचाऱ्यांना लगतच्या पदावर वेगवर्धित पदोन्नतीची पात्रपात्रता तपासतांना विभागीय वेगवर्धित पदोन्नती समितीने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे पात्र ठरलेल्या खालील ०२ पोलीस कर्मचाऱ्यांना पोलीस उप निरीक्षक पदावर स्थानापन्न व तात्पुरती (Provisional) वेगवर्धित पदोन्नती देण्यात येत असून सदर पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या रकाना क्र.४ मधील घटकांत करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | पोलीस कर्मचाऱ्यांचे नाव | सध्याची नियुक्ती | पदोन्नतीवरील नियुक्ती |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | सपोउपनि / ८५८, विनोदकुमार लालताप्रसाद तिवारी | चंद्रपूर | नागपूर परिक्षेत्र |
| २. | सपोउपनि / १३३१, मोतीराम बक्काजी मडावी | गडचिरोली | गडचिरोली परिक्षेत्र |

२. सदरहू प्रकरणी वर नमूद पोलीस कर्मचाऱ्यांना पदोन्नतीवर हजर होण्यासाठी कार्यमुक्त करण्यात यावे. तसेच, ते पदोन्नतीवर हजर झाल्याचा दिनांक अभिलेखासाठी त्वरेने या कार्यालयास कळवावा.

३. सदरचे आदेश इंटरनेटवरा **http://www.mahapolice.gov.in** या संकेतस्थळावर FLASH या शिर्षाखाली देखील उपलब्ध आहेत.

४. पदोन्नत झालेल्या सर्व पोलीस कर्मचाऱ्यांचे अभिनंदन व शुभेच्छा.

( राजकुमार व्हटकर )
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, विशेष अभियान, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर.

२. विशेष पोलीस महानिरीक्षक यांना विनंती करण्यात येते की, सपोउपनि / विनोदकुमार लालताप्रसाद तिवारी यांना पोलीस उप निरीक्षक पदाच्या वेगवर्धित पदोन्नतीवर चंद्रपूर जिल्हयात नेमणूक देण्यात यावी.

प्रति,

विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
पोलीस अधिक्षक, चंद्रपूर.

प्रत,

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.४, ९ व २१-अ.
कार्यासन क्र.५ मधील प्रमुख लिपीक.

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई.

२. सदर आदेश १५ दिवसांसाठी संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत.